महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.org
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./SMURH/IT/२०२४/२५६ दि: ०६/०२/२०२४

प्रति,

**मा. आयुक्त,**
आदिवासी विकास विभाग,
आदिवासी विकास भवन,
नाशिक.

**विषयः- प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत जिल्ह्यांची माहिती कळविणेबाबत.**

**संदर्भ:-** १) मा.श्री.विभु नायर, सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. D.O.No.१६०१३/११/२०२३-TRI, दि.०६/१२/२०२३.
२) मा.श्री.अनिल कुमार सिंह, अवर सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. L-१२०५१/०१/२०१३-RH, दि.०८/१२/२०२३.
३) मा.प्रधान सचिव, गामविकास व पंचायत राज विभाग यांचे पत्र क्र. प्रमआयो-जी-२०२३/प्र.क्र.२९४/योजना-१०, दि.१५ डिसेंबर, २०२३.
४) मा.श्री.गया प्रसाद, उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.DO.No.J-११०१३/२/२०२३-RHPol.(३८६६६९), दि.१८/१२/२०२३.
५) या कार्यालयाचे पत्र क्र.SMURH/IT/२०२३/२१६१, दि.१९/१२/२०२३.

उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ अन्वये, मा. प्रधानमंत्री महोदय यांनी दि. १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी जनजाती गौरव दिनानिमित्त प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) सुरु केले आहे. देशातील ७५ विशेषतः असुरक्षित आदीवासी गटांचा विकास करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. तसेच भारत सरकारने प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) ला ९ मंत्रालयांद्वारे ११ विशेष बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मान्यता देखील दिली आहे. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM-JANMAN) अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना मुलभूत सुविधांसह पक्की घरे बांधण्यासाठी प्रती घरकुल रु.२.३९ लाख (घरकुल अनुदान २.०० लाख, रु.१२,०००/- SBM-G आणि मनरेगा अंतर्गत ९०/९५ दिवसांचे अकुशल वेतन रु.२७०००/- अंदाजे) अशी तरतूद केली आहे.

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी या अभियानांतर्गत चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे व यवतमाळ या ११ जिल्ह्यांची माहिती दिली आहे. त्यामध्ये ४९ तालुके व ६७३ ग्रामपंचायती मधील १६,००० लाभार्थ्यांची माहिती आवास सॉफ्ट प्रणालीवर दिली आहे.

तसेच संदर्भ क्र.४ अन्वये, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत ज्या ग्रामपंचायतीमध्ये आदिम जमातीतील संवर्गामधील (कोलाम, कातकरी व माडीया गोंड) लाभार्थी आहेत. परंतु त्या जिल्ह्यांचा, तालुक्यांचा व ग्रामपंचायतीचा विशेषतः असुरक्षित आदिवासी गट (PVTGs) च्या सर्वेक्षणामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. अशा ग्रामपंचायतीची माहिती सदर करणेबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी कळविले होते.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.५ अन्वये, जिल्ह्यांकडून या संदर्भात माहिती मागविण्यात आली असून, चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्घ, ठाणे व यवतमाळ या ११ जिल्ह्यांव्यतिरिक्त अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा या ४ जिल्ह्यांकडूनही माहिती प्राप्त झाली असून, ती आवास सॉफ्ट प्रणालीवर समाविष्ट करण्यात आलेली आहे. परंतु अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यांना तसेच उर्वरित जिल्ह्यात नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतींना आदिवासी व्यवहार मंत्रालय (MoTA), भारत सरकार यांचेकडून परवानगी मिळाली नसल्याने, सदर ४ जिल्ह्यांतील लाभार्थ्यांना तसेच उर्वरित जिल्ह्यात नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायती मधील लाभार्थ्यांना मंजूरी देणे शक्य होत नाही.

तरी सदर ४ जिल्ह्यांतील तसेच उर्वरित जिल्ह्यांतील नव्याने समावेश केलेल्या ग्रामपचायतींची माहिती आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांना आपलेस्तरावरुन कळविण्याविषयी संबंधितांना सूचना द्याव्यात, ही विनंती.

**सोबत :** १) आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांना कळविण्यासाठी ग्रामपंचायतींची यादी.

२) आवास सॉफ्ट प्रणालीवर सर्व्हे करण्यात आलेल्या सर्व ग्रामपंचायतींची यादी

**(नीलेश काळे)**
उप संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत :-**

१. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा.कार्यकारी अध्यक्ष, तथा मुख्य कार्याकरी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्घ, ठाणे, यवतमाळ, अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा यांना माहितीस्तव.
५. मा.उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव.
६. मा.अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास भवन, नाशिक यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
७. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्घ, ठाणे, यवतमाळ, अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा यांनी आपल्या जिल्ह्यांची यादी प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यांना पुढील कार्यवाहीसाठी द्यावी.